# `सस्नेह नमस्कार !`

रुबी हॉल क्लिनिकमधील माझ्या अतिदक्षता विभागामध्ये एक दिवस एक ओळखीची मध्यमवर्गीय, सुशिक्षित महिला आपल्या मुलासह आली. त्या माझ्याकडील एका रुग्णाच्या नातेवाईक असाव्यात असा माझा अंदाज होता. त्यांनी बोलण्यासाठी माझी वेळ मागितली. त्यानुसार, आम्ही बोलू लागलो.
``सर, एक विनंती होती...``
``बोला...``
`` सर मागील वर्षी माझ्या पतींवर आपल्या इथेच उपचार झाले होते, हे आपणास आठवत असेलच. त्यांचा पुढील महिन्यात पहिला स्मृतीदिन आहे. त्यावेळी आम्ही एक छोटेखानी कार्यक्रम ठेवला आहे. त्यात त्यांच्या आठवणींवरील पुस्तकाचे प्रकाशन केले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी तुम्ही प्रमुख पाहुणे म्हणून यावे, अशी आमच्या कुटुंबाची तीव्र इच्छा आहे.``
हे ऐकून मी गोंधळलो..कारण आपणाकडे अशी काही विचारणा होईल, याचा विचारही कधी केलेला नव्हता. त्यामुळे, मी स्वाभाविकच त्यांना सांगितले, की पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे हे काही जमणार नाही. मात्र, त्यावर त्या महिलेने सांगितले, काही हरकत नाही आम्ही कार्यक्रमाची तारीख बदलतो...मात्र तुम्ही यायलाच हवं...आता मात्र, माझ्यासाठी प्रकरण नक्कीच गंभीर झालं होतं. रोज नवनवीन रुग्णांना अतिदक्षता विभागात आम्ही सांभाळतो....काहींना वाचविण्यात यश येतं तर काही त्याबाबतीत कमनशिबी ठरतात. त्यामुळे आपले वैद्यकीय कसब आणि रुग्णांवरील उपचार अशा स्वतःच्या विश्वात रमणाऱ्या माझ्यासारख्या डॉक्टरसाठी असे प्रसंग अगदीच दुर्मिळ. त्या महिलेशी बोलत असतानाच, मला तिचे पती...त्यांच्यावरील उपचार आदी सर्व गोष्टी आठवल्या. सुमारे व्रर्षभरातला प्रसंग असावा...

तिच्या पतींना अन्य रुग्णालयातून आमच्याकडे अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले, तेव्हा त्यांची अवस्था अत्यंत गंभीर होती. त्यांच्या मेंदूतील रक्तस्त्रावाबरोबरच (सीव्हीए) छातीतही संसर्ग झालेला होता. त्यांची प्रकृती इतकी खराब होती की, दाखल करतेवेळी त्यांना कृत्रिम श्वासोच्छवास, हायर अँटीबायोटिक्स आणि अन्य लाइफ सपोर्टवर ठेवण्यात आलेले होते. त्यांच्यावर उपचार सुरु झाल्यानंतर पहिले काही दिवस प्रतिसाद संथच होता. काही काळानंतर त्यात सुधारणा होत गेली. व्हेंटिलेटर व लाइफ सपोर्ट काढण्यात आले. त्यांना आपल्या नातेवाईकांना हळूहळू ओळखता येऊ लागले. ही सुधारणा डॉक्टर म्हणून आमच्यासाठी पुरेशी समाधानकारक नसली तरी त्यांच्या आप्तेष्टांसाठी लक्षणीय बाब होती...जी कदाचित आम्ही कधी विचारात घेतलेली नसते...कधी त्याकडे विशेष लक्ष दिलेले नसते. काही दिवसांनंतर चांगली सुधारणा दिसल्यानंतर या रुग्णाला डिस्चार्ज देण्यात आला. यानंतर, त्यांच्या तब्येतीबाबत काही तक्रार आल्यास त्यांच्याशी, कुटुंबियांशी बोलणे व्हायचे. किरकोळ तक्रारींबाबत अनेकदा फोनही यायचे. एकदा त्यांना काही दिवस दाखल करुन पुन्हा सुधारणा दिसल्यानंतर सोडूनही दिले होते. काही महिन्यांचा काळ लोटला. यावेळी त्यांना

न्यूमोनियासदृश्य तीव्र संसर्गाने बाधलेल्या अवस्थेत दाखल करण्यात आले. यावेळी मात्र, नशीबाने पूर्वीसारखी साथ दिली नाही आणि त्यांनी जगाचा निरोप घेतला..

हा सारा आठवणींचा पट माझ्या नजरेपुढून गेला. अखेर, मी त्यांना येण्याचे कबूल केले. माझे आभार मानून त्या गेल्या...पण माझ्यापुढे नवाच प्रश्न उभा राहिला, तो आपण तेथे काय बोलणार....काय म्हणून या लोकांच्या पुढे जाणार. आपल्या रुग्णावर उपचार करताना त्यात शंभर टक्के समाधान मिळाले नाही तरी अस्वस्थ होणाऱ्या माझ्यासारख्या अतिदक्षता विभागाशी कायमची नाळ जुळलेल्या डॉक्टरला सर्वच रुग्णांना कायमच गंभीर अवस्थेतच पाहण्याचा, त्यांच्यावर तशा अवस्थेतच उपचार करण्याचा प्रसंग येतो. त्यामुळे, सदर रुग्णाला पहिल्या टप्प्यातील आजारातून आपण काहीसा दिलासा देऊ शकलो मात्र दुसऱ्या वेळी मात्र ते जमले नाही...याचे एक शल्य मनात होतेच. तरीही नेहमी डोक्याने विचार करणाऱ्या माझ्यातील डॉक्टरने यावेळी मनाचे ऐकायचे ठरवले आणि त्या प्रथम पुण्यस्मरणाच्या कार्यक्रमास जायचे ठरविले.

हा कार्यक्रम माझ्या अपेक्षेपेक्षाही खूपच मोठा, भव्य मात्र भावपूर्ण स्वरुपाचा होता. समाजकारण, राजकारणातील अनेक दिग्गजांसह संबंधित रुग्णाचा फार मोठा मित्रपरिवार या कार्यक्रमास लोटला होता. आजवर ज्यांकडे आपण पेशंट म्हणून पाहात होतो, ती व्यक्ती एक माणूस म्हणून समाजात किती लोकप्रिय होती...हे मला या निमित्ताने तिथे जाणवले. याप्रसंगी, माझ्या हस्ते प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तकामध्ये त्यांच्या संपर्कात आलेल्या आप्तेष्टांनी लिहलेल्या आठवणींची साठवण होती. यावेळी बोलायचे काय, या प्रश्नाचे उत्तर मला कार्यक्रम चालू असेपर्यंत मिळालेले नव्हते. अखेर बोलण्यास उठलो आणि मनात येईल तशा भावना व्यक्त करायचे ठरविले. एक डॉक्टर म्हणून आपल्याला या रुग्णाला वाचवण्यात यश आले नाही, ही मनातली बोचही मी मोकळपणाने उघड करुन दाखवली. मात्र, त्यावर संबंधित व्यक्तीच्या नातेवाईकांनी जाहिरपणे मला सांगितलेली गोष्ट माझ्या मनातला संकोच काढून गेली.... डॉक्टर, आपण म्हणता की मला त्यांना वाचवण्यात यश मिळाले नाही...पण त्याआधी जेव्हा त्यांना अत्यंत गंभीर अशा मरणासन्न अवस्थेत आपल्याकडे आणले गेले होते...त्यानंतर आपण केलेल्या उपचार आणि आस्थेने केलेल्या देखभालीमुळे ते त्या अवस्थेतून बाहेर पडले...त्यांना जणू बोनस आयुष्य लाभले...ज्यामुळे ते आमच्यात परतले आम्हाला त्यांच्या संगतीमध्ये अधिक काळ घालवता आला....आमच्यासाठी हे अधिक महत्त्वाचे आहे. म्हणूनच, आजच्या कार्यक्रमासाठी अन्य कोणाहीपेक्षा तुमची उपस्थितच आमच्यासाठी अधिक महत्त्वाची होती....याच आशयाचं उत्तर त्यांनी पत्राद्वारे मला लिखित स्वरुपात दिले. त्याची सुरवातच मनाला स्पर्शून गेली- *`सस्नेह नमस्कार या शब्दांतूनच आपलं आमच्या कुटुंबाशी असणारं नातं स्पष्ट होतंयं.....!`*

माझ्यासाठी अत्यंत वेगळ्या अशा या अनुभवातून एक गोष्ट साध्य झाली. डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील संबंधांबाबत मनात असणाऱ्या काही शंकांचा तळ या अनुभवातून पुरता ढवळला गेला. प्रामाणिक भावनेने, शुद्ध अंतःकरणाने आणि व्यावसायिक निष्ठेने कार्यरत राहा....त्याचे फळ कुठे ना कुठे, कुणाला ना कुणाला चांगलेच मिळत असते, हा विचार स्वतःवरील विश्वास वाढवणारा होता.

आजच्या काळात वैद्यकीय क्षेत्रात विशेषतः डॉक्टरकडे पाहण्याचा दृष्टिकोन कलुषित होतोय असं म्हणतात....तरीही असे काही निरलस अनुभव मनाला स्पर्शून जातात.....मनाच्या अशा कोपऱ्याला जो अनेकदा डॉक्टर आपल्या कार्यबाहुल्यात क्वचित विसरून गेलेले असतात...तो असा अवचित सापडला तरी एक नवं आकाश गवसतं....जे खरं तर आपल्याच कवेत असतं. असा अनुभव येणं, हे कदाचित एक निमित्त असतं.

- **डॉ. कपिल झिरपे (** संचालक, न्यूरो ट्रामा युनिट- रुबी हॉल क्लिनिक, पुणे )